

# दुधाळ जनावरांची निवड

दुग्ध व्यवसाय सुरु करतांना उत्तम, निरोगी आणि दुधाळ गायीची निवड केली पाहीजेत. मोठया शहरात म्हशीच्या दुधाला जास्त मागणी आहे. म्हशीच्या दुधात गायीच्या दुधापेक्षा स्निग्धांशाचे प्रमाण जास्त असल्याने त्याला अधिक दर मिळतो. दुधाळ जनावरांची निवड करतांना आपण ज्या भागात हा व्यवसाय सुरु करणार आहोत त्या भागातील स्थानिक परिस्थिती लोकांची दुधाविषयी आवड, स्थानिक बाजारपेठ, आणि दुधाच्या भावातील चढउतार, चाऱ्याची उपलब्धता लक्षात घेऊनच गायी किंवा म्हशी दुध व्यवसायासाठी निवडायच्या हे निश्चित करायला पाहीजे.

दुग्ध व्यवसाय सुरु करण्याअगोदर योग्य जनावरांची काळजीपुर्वक निवड करुन खरेदी करणे आवश्यक आहे. जनावरे विशिष्ठ वातावरणात कशी रुळतील आणि त्यापासून आपल्याला जास्तीत जास्त दुध उत्पादन कसे मिळेल ते पाहणे आवश्यक आहे. अनुकुल वातावरणात अधिक दुध उत्पादन करण्यासाठी सकस संतुलित आहार आणि उत्तम व्यवस्थापन ठेवल्यास दुध व्यवसाय फायदेशिर ठरू शकतो.

दुग्ध व्यवसायात आपल्या वातावरणात चांगल्या तग धरु शकणाऱ्या जातीच्या दुधाळ जनावारांची निवड करावी. जास्त दुध देणाऱ्या जातींपेक्षा उत्तम वळूपासून तयार झालेली, जास्त दुध उत्पादन देणारी जनावरे निवडावीत. त्याकरीता वळूंच्या वंशावळीतील नोंदीची तपासणी खरेदीपुर्वी करणे हे गरजेचे असते. तसेच वळूच्या आणि दुधाळ जनावरांच्या शरीर रचनेची माहीती असणे गरजेचे आहे. अन्यथा शेतकरी बांधवांनी पशुतज्ञांच्या सल्ल्याने आणि अनुभवी शेतकऱ्याची मदत घेऊनच दुधाळ जनावरांची खरेदी करावी.

दुधाळ जनावरांची निवड करण्यापुर्वी प्रथम वंशावळीतील नोंदीच्या आधारे माहीती करुन घेणे महत्त्वाचे असते. त्यामध्ये वळूचा पुर्व इतिहास माहीत करुन घेणे गरजेचे असते. त्याचबरोबर त्यांच्या माता पित्यांचे उत्पादन माहीत करुन घेणे आवश्यक आहे. तदनंतरच त्या वळूपासून तयार होणाऱ्या दुधाळ गायीची निवड करण्यासाठी तयारी दर्शवावी. दुधाळ जनावरांच्या निवडीकरीता शरीररचनेचे मुद्दे पडताळून योग्य त्या जनावरांची निवड करावी.

शक्यतो पहिल्या आणि दुसऱ्या वेताची गाय निवडावी. वय-तीन ते चार वर्षे इतके असावे. गायीचे डोके - मध्यम, कपाळ पुढे आलेले, चेहरा लांब आणि स्पष्ट असावा, जास्त मोठे डोके, चेहरा ओबड धोबड, अरुंद कपाळ असलेली जनावरे निवडू नयेत. गायीची त्वचा ही मऊ, सैल, सतेज (तजेलदार) कमी जाडीची असावी. स्पर्श केला असता कातडी ही चरबी विरहीत असावी. मान ही सडपातळ लांब असावी. मान ही डोके आणि शरीराच्या भागात समांतर जोडलेली असावी (एकरुप असावी). छाती ही रुंद आणि भरदार असावी. पुढील पायांमध्ये छातीच्या पिंजऱ्याजवळ योग्य आणि भरपुर अंतर असावे. खांदा हा बळकट, भरीव, शरीराला एकरुप असावा. पाठ सरळ, रुंद आणि पाठीच्या कण्याला समांतर असावी. बरगडया ह्या रुंद, बाकदार आणि अर्धगोलाकार असाव्यात. दुधाळ गायीमध्ये शेवटच्या तीन बरगडया ह्या दिसतात. बरगडया ह्या पातळ, लांब आणि चपटया असाव्यात. पाठीमागील भाग त्रिकोणाकृती असावा मागील बाजूंनी जनावरांचे निरीक्षण केल्यास तो रुंद असलेल्या जनावराची निवड करावी. डोळे हे रेखीव आणि तेजस्वी, पाणीदार

प्रकाशन
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत

मोठे असावेत. मागील पायात कासेला सामावून घेण्यासाठी भरपुर अंतर असावे. पायाचे खुर समतोल आणि रुंद सपाट असावेत. चांगली कास आणि सड हा दुग्धव्यवसायाचा महत्वाचा केंद्रबिंदू समजला जातो. कास मोठी आणि पोटास चिकटलेली असावी. समान आकाराचे सड समान अंतरावर विभागलेले असावेत. कास मऊ असावी. लोंबकळणारी अप्रमाणशीर कास नसावी. लोंबकळणारी कास दुध काढण्यास अयोग्य आणि अडथळा करणारी असते. अशा कासेला स्तनदाह, जख्रमा होण्याचा संभव असतो. चारही सड आकाराने समान, मोठया आणि समान अंतरावर असाव्यात तसेच कासेचा मागील आणि पुढील भाग समान असावा. दुध काढल्यानंतर कासेचा आकार लहान, पण लोंबकळणारा नसावा. दुग्धशीर ही मोठी नागमोडी आणि ठसठसीत असावी. शक्य असल्यास निवडीपुर्वी दुध काढून आणि मोजून पहावे. स्तनदाह चाचणी करुन घ्यावी. पुढील पाय मजबूत, बळकट, सरळ असावेत. दोन्ही पायामधील अंतर अधिक असावे. दुध देतानाच्या सवयी, पान्हावण्याच्या सवयी, दुध काढण्याची पद्धत, गाय-म्हैस मारकी अथवा खोडकर आहे का इत्यादी गोष्टींची माहीती करुन घ्यावी.

दुभती जनावरे व्यवसायाच्या सुरवातीस बाहेरच्या प्रांतातुन विकत आणू नयेत कारण महाराष्ट्रातील हवामान त्यांना मानवेलच याची खात्री नसते तसेच ती विविध आजाराने बाधीत असु शकतात. त्याकरीता घरच्या घरी आपल्या गायीच्या कळपातील संख्या वाढवण्यावर भर द्यावा. मुके सड असलेल्या, स्तनदाहाने बाधीत असलेल्या, तापट, आक्रमक, मारामारी करणाऱ्या धार काढण्यास त्रासदायक असलेल्या, गुडघ्याखाली लोंबती कास असलेल्या, एका पातळीत समांतर अंतरावर सड नसलेल्या, वांज, फळत नसलेल्या, गायी कळपात प्रजोत्पादनासाठी वापरू नयेत. आपणास गाय विकत घेताना वरील बाबींचा विचार करुनच गायीची निवड करावी.




✲ मार्गदर्शक ✲

www.mafsu.in | www.knpcvs.in

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा,
मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन,
मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण,
मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ लेखक ✲

**डॉ. एस. एम. भोकरे** **डॉ. ए. व्ही. खानविलकर**
पशुव्यवस्थापन विभाग,
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ संकलन ✲

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.**